ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# पुणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील कृषी पर्यटन संधी व आव्हाने: जुन्नर, खेड आणि आंबेगाव तालुक्यांचा अभ्यास

**किशोर मुठे[1], प्रा. डॉ. सोमनाथ पाटील[2]**

[1]*संशोधक विद्यार्थी, बाबुरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी, पुणे-411027*

[2]*अर्थशास्त्र विभाग प्रमुख,*

*साहेबराव शंकरराव ढमढेरे कला आणि वाणिज्य कॉलेज तळेगाव ढमढेरे,*

*तालुका- शिरूर, जिल्हा-पुणे 412208*

***Corresponding Author:* किशोर मुठे**

**DOI - 10.5281/zenodo.14880932**

**गोषवारा:**

*पुणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील कृषी पर्यटनाच्या संधींचा अभ्यास करताना जुन्नर, खेड आणि आंबेगाव तालुक्यांतील नैसर्गिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. कृषी पर्यटन ही ग्रामीण भागातील आर्थिक विकासासाठी एक प्रभावी संकल्पना ठरू शकते, ज्यामुळे शहरी लोकांना ग्रामीण जीवनाचा अनुभव घेता येतो आणि शेतकऱ्यांना त्यांच्या पारंपरिक उपजीविकेव्यतिरिक्त अतिरिक्त उत्पन्नाचे साधन मिळते.*

*शहरीकरणामुळे हरवत चाललेली ग्रामीण संस्कृती आणि जीवनशैली टिकवण्यासाठी कृषी पर्यटन एक महत्त्वपूर्ण साधन ठरू शकते. जुन्नर तालुक्यातील लेण्यांचे क्षेत्र, खेड तालुक्यातील धार्मिक स्थळे, आणि आंबेगाव तालुक्यातील निसर्गरम्य प्रदेश हे पर्यटनासाठी आदर्श ठिकाणे मानली जातात. तथापि, या भागातील लोकांना पायाभूत सुविधांचा अभाव, अपुरी बाजारपेठेची माहिती, आणि स्थानिक लोकांमध्ये कौशल्याचा अभाव यांसारख्या अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.*

*सरकार आणि स्थानिक संस्थांनी एकत्रितपणे काम करून कृषी पर्यटनाला चालना दिल्यास या भागातील रोजगार निर्मिती आणि स्थलांतर रोखण्यास मदत होईल. आदिवासी भागातील तरुणांना प्रशिक्षण देणे, पर्यटनाला जोडलेले व्यवसाय सुरू करणे, आणि स्थानिक उत्पादने बाजारात आणणे या उपक्रमांना प्रोत्साहन दिले पाहिजे. कृषी पर्यटन हा आदिवासी भागाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी एक प्रभावी उपाय ठरू शकतो.*

***मुख्य शब्द: कृषी पर्यटन, आदिवासी समाज, ग्रामीण विकास, अर्थशास्त्रीय दृष्टिकोन, पुणे जिल्हा, संधी, आव्हाने, शिफारसी.***

**प्रस्तावना:**

पर्यटनाला हजारो वर्षाची परंपरा असून पर्यटन व भटकंती करणे ही मनुष्याची स्वाभाविक आवड आहे. वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन च्या अहवालानुसार 21व्या शतकातील सर्वात झपाटाने वाढणाऱ्या व्यवसायामध्ये पर्यटन हा व्यवसाय आहेत. सुट्टी मिळाली की, आपल्या कुटुंबासह, मित्र परिवारासह फिरायला जाणे व सहलीचा आनंद घेणे हा पर्यटनाचा मुख्य उद्देश असला तरी अलीकडच्या काळात गर्दीने वेढलेल्या स्थळांऐवजी निसर्गाच्या सानिध्यात निवांत शांततेचे क्षण अनुभवण्यासाठी पर्यटन होत असल्याचे दिसते. 'अतिथी देवो भव:'ही आपली भारतीय संस्कृती आहे. या संस्कृतीचा अनुबंध कृषी प्रधान भारताशी आहे. भारतीय संस्कृती ही मुख्यता ग्रामीण भागाचे निगडित असल्याने प्रत्येकालाच आपल्या ग्रामीण संस्कृतीची ओढ असते. शहरातील धकाधकीच्या जीवनात कंटाळलेल्या प्रत्येक व्यक्तीला आनंद घेण्यासाठी निवांतपणे निसर्ग सानिध्यात जावेसे वाटते

म्हणून कृषी पर्यटन हा अलीकडे झपाट्याने विकसित झालेला पर्यटनाचा प्रकार आहे. गाव आणि गाव पण हरवत चाललंय असे आपण म्हणतो परंतु आजही खेड्यांची ओढ असलेले शहरी भागातील लोक आपल्या ग्रामीण संस्कृतीशी नाते टिकून ठेवण्यासाठी आणि नवीन पिढीला संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी खेड्यात जातात.

जागतिक अर्थकारणामध्ये आज पर्यटन उद्योग झपाट्याने पुढे येत अनेक विकसित देशात पर्यटन व्यवसायाकडे उत्पन्नाचे साधन म्हणून पाहिले जाते. जगाच्या एकूण जीडीपीमध्ये आज पर्यटन व्यवसायाचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष योगदान जवळपास 14% इतके आहे. भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये पर्यटन हे रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाचे एक महत्त्वपूर्ण साधन ठरले आहे. महाराष्ट्राचा विचार केल्यास 2017 हे वर्ष व्हिजीट महाराष्ट्र इयर म्हणून साजरे करण्यात आले. देश विदेशातून येणाऱ्या पर्यटकांना महाराष्ट्र कळवा त्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. महाराष्ट्र सरकारने 2016 मध्ये पर्यटन धोरण जाहीर केले. या धोरणानुसार राज्यातील पर्यटन स्थळी पायाभूत सुविधांचा विकास करण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे. दहा लाख रोजगार संधी आणि तीस हजार कोटीची गुंतवणूक करण्याचे लक्ष ठेवण्यात आले होते. नव्या पर्यटन धोरणात धार्मिक ,वैद्यकीय, निसर्ग व कृषी पर्यटनाकडे खास लक्ष ठेवण्यात आले आहे. कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळण्यास मदत होते. अलीकडच्या काळात शहरी भागातील मध्यम आणि उच्च मध्यमवर्गीय यांचा कृषी पर्यटनाकडे ओढा वाढत चालला आहे.

महाराष्ट्राचा विचार केल्यास महाराष्ट्र हे विविध संपन्नतेने नटलेले राज्य असून महाराष्ट्राला कृषी क्षेत्राची परंपरा फार जुनी आहे. महाराष्ट्र राज्य हे ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागात विस्तारलेले असून शहर व ग्रामीण भाग दोघेही एकमेकांवर अवलंबून आहेत. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात आदिवासी भाग प्रामुख्याने आढळतो. कृषी क्षेत्राचा विचार केल्यास महाराष्ट्राला निसर्गाने भरभरून दिल्याने कृषी क्षेत्र आज आघाडीवर दिसते. परंतु नैसर्गिक व मानवी आपत्तीमुळे कृषी क्षेत्राचा विकासाचा मार्ग कमी होताना दिसतो आहे. शेतकऱ्यांना शेतीला पूरक व्यवसाय म्हणून अनेक पर्याय असून यापैकी सर्वात स्वस्त आणि किफायतशीर मार्ग म्हणजे कृषी पर्यटन होय. आजमितीला कृषी पर्यटन केंद्र चालवणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या जरी कमी असली तरी भविष्यात कृषी पर्यटन केंद्रांची संख्या वाढलेली दिसून येईल. महाराष्ट्रातील विभागांचा विचार केल्यास पश्चिम महाराष्ट्र व कोकण विभाग कृषी पर्यटनात आघाडीवर असल्याचे दिसते. कोकणात निसर्गाने भरभरून दिल्याने कृषी पर्यटनाला भरपूर वाव आहे तर पश्चिम महाराष्ट्रात औद्योगीकरण,शिक्षण, शेती क्षेत्राचा प्रचंड विकास झाल्याने नागरिकरण मोठ्या प्रमाणात घडून आल्याने या भागात कृषी पर्यटनाला वाव असल्याने कृषी पर्यटन वाढलेले दिसते.

पश्चिम महाराष्ट्राचा विचार केल्यास पुणे जिल्हा कृषी पर्यटनात आज आघाडीवर असल्याचे स्पष्ट होते. पुणे जिल्हा हा संतांचा जिल्हा म्हणून ओळखला जात असला तरी प्रगतशील शेतकरी आणि औद्योगीकरण शिक्षण संगीत कला क्रीडा इत्यादींमुळे प्रसिद्ध जिल्हा म्हणून ओळखला जातो. पुणे जिल्ह्यातील जवळपास सर्व तालुक्यांमध्ये कृषी पर्यटन केंद्र चालवणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या दिसून येते. कृषी पर्यटनातून पर्यटकांना निसर्गसौंदर्य शेतीतील वनस्पती फळे फुले झाडे इत्यादी माहिती होते. पर्यटन केंद्राच्या आसपास असणारी धार्मिक स्थळे शेती आधारित विविध उद्योग पक्षी प्राणी इत्यादींची माहिती यामधून होत असल्याने आणि ग्रामीण भागातील खाद्य संस्कृती ग्रामीण संस्कृतीचा आनंद लुटा येत असल्याने आज बहुतेक पर्यटक शनिवारी व रविवारी कृषी पर्यटन करण्यासाठी येताना दिसतात. पुणे शहरापासून जवळपास असणाऱ्या कृषी पर्यटन केंद्राला भेट देऊन संध्याकाळी पुन्हा आपल्या घरी परतता येईल अशी एक

दिवसीय व दोन दिवसीय सहल करणाऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. अशा कृषी पर्यटन केंद्राला भेट दिल्याने फक्त शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते असे नाही तर शेतकऱ्यांबरोबरच त्यांच्याकडे कामाला असणाऱ्या स्त्रिया व पुरुष कामगारांचेही उत्पन्न वाढते याशिवाय स्त्रिया व पुरुष अशा दोघांनाही रोजगार प्राप्त होतो. तसेच शेतकऱ्यांनी आपल्या शेतात उत्पादित केलेला भाजीपाला,कडधान्य,फळे,फुले यांचीही विक्री मोठ्या प्रमाणात होताना दिसते. हे सर्व असले तरी कृषी पर्यटनाला अजून भरपूर विस्तारण्याची संधी आहे. परंतु आजही पुणे जिल्ह्यातील आदिवासी भागात कृषी पर्यटन केंद्राचा विकास हा झालेला नाही. आदिवासी भागात कृषी पर्यटनाचा विकास झाला तर आदिवासी भागातील शेतमजुरांचे होणारे स्थलांतर थांबेल आणि त्यांना गावात शाश्वत रोजगार उपलब्ध होईल.

पुणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील कृषी पर्यटन संधींचा विकास झाला तर आदिवासी भागातील बेरोजगारीचे प्रमाण काही प्रमाणात कमी करण्यास यश येऊ शकते.

**संशोधन लेखाचे उद्दिष्टे:**

1. पुणे जिल्ह्यातील जुन्नर, खेड, आणि आंबेगाव तालुक्यांमध्ये कृषी पर्यटनाच्या संधींचा अभ्यास करणे.
2. कृषी पर्यटनासाठी आदिवासी भागातील नैसर्गिक व मानवी संसाधनांचा योग्य उपयोग कसा करता येईल, हे समजावून घेणे.
3. कृषी पर्यटनाच्या वाढीसाठी येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करून उपाय सुचवणे.
4. कृषी पर्यटनाद्वारे आदिवासी समाजाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्याचे मार्ग सुचवणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन लेखातील माहिती ही कृषी पर्यटन विषयक संदर्भ पुस्तके, शासकीय अहवाल मासिके वर्तमानपत्रातील लेख, इंटरनेटवरील वेबसाईट यांचा आधार घेऊन माहिती ते विश्लेषण केले आहे.

**कृषी पर्यटन संकल्पना:**

शहरातील वाढती वर्दळ, प्रदूषण आणि मानसिक ताण कमी करण्यासाठी अनेकांची पावले गावातील निसर्ग आणि शेतीतील शांत ठिकाणाकडे वळत आहेत आणि यातूनच कृषी पर्यटनाची संकल्पना पुढे आलेली दिसते. गेल्या अनेक वर्षात शेती उत्पादनाला कमी भाव मिळत असून शेतीसाठी लागणाऱ्या खर्चात वाढ होत असल्याने शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नात घट होताना दिसते. शेतीतून उत्पन्न वाढवण्यासाठीच कृषी पर्यटन व्यवसायाची संधी उपलब्ध झालेली दिसते. कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकासातून महाराष्ट्राचा विकास या ब्रीदवाक्याला साजेसे कृषी पर्यटन आहे. शिक्षण आणि करमणूक हे दोन्ही हेतू ठेवून पर्यटक कृषी पर्यटनाकडे आकर्षित होतात. शहरी लोकांना आपल्या जुन्या संस्कृतीची ओळख करुन देण्याबरोबरच खेड्यातील शेतकरी वर्गाला उत्पन्न, रोजगार आणि आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याचा व्यापक दृष्टिकोन कृषी पर्यटनाच्या उपक्रमामागे आहे. शेती आणि पर्यटनाला जोडणारा दुवा म्हणजे कृषी पर्यटन केंद्र होय.

**कृषी पर्यटनाची व्याख्या:**

शेतावरील फेरफटका, आपल्या संस्कृतीची ओळख, आंनद, शहरी जीवनशैलीचा उबग आलेल्या लोकांनी चार दिवस शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन राहणे व शेतकऱ्यांनी शहरी लोकांचा सशुल्क पाहुणचार, आदरातिथ्य करणे म्हणजेच कृषी पर्यटन होय.

**कृषी पर्यटनाचे प्रकार:**

कृषी पर्यटनाच्या प्रकारांचे वर्गीकरण पर्यटकांच्या गरजांनुसार व उपलब्ध संसाधनांनुसार केले जाते. त्यामध्ये प्रामुख्याने दोन प्रमुख प्रकार आहेत:

| | एक दिवसीय कृषी पर्यटन | निवासी कृषी पर्यटन |
|---|---|---|
| व्याख्या | अशा प्रकारच्या कृषी पर्यटनात पर्यटक एका दिवसासाठी शेतावर भेट देतात आणि ग्रामीण जीवनाचा अनुभव घेतात. | अशा प्रकारच्या कृषी पर्यटनात पर्यटक 1 दिवसापेक्षा अधिक कालावधीसाठी शेतावर वास्तव्यासाठी येतात. |
| वैशिष्ट्ये | अल्पकालीन भेटी.<br>ग्रामीण संस्कृती, शेतीची पद्धती, व शेतावर चालणाऱ्या विविध कामांचे अनुभव मिळतात.<br>कुटुंब, विद्यार्थी, किंवा मित्रांसाठी आदर्श प्रकार. | दीर्घकालीन अनुभव (2 दिवसांपासून ते 1 आठवड्यापर्यंत).<br>पर्यटक शेतकऱ्यांच्या कुटुंबासोबत राहतात आणि शेतीशी संबंधित सर्व कामांमध्ये सहभाग घेतात.<br>ग्रामीण संस्कृती, खाद्यसंस्कृती, परंपरा व सण यांचा अनुभव घेतला जातो. |
| लाभ | शहरी लोकांना ग्रामीण जीवनाची ओळख होते.<br>कमी खर्चात निसर्गसंपन्न अनुभव मिळतो.<br>शेतकऱ्यांना त्यांची उत्पादने व सेवांचा थेट फायदा होतो. | शेतकऱ्यांसाठी अधिक उत्पन्न मिळवण्याचा मार्ग.<br>शहरी पर्यटकांना ग्रामीण जीवनाचा सखोल अनुभव.<br>ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था बळकट होते. |
| उदाहरणे | शेतावर भात रोपांची लागवड किंवा कापणीचा अनुभव.<br>फळबागांना भेट देऊन फळे तोडण्याचा अनुभव.<br>शेतातील प्राणी पालनाचे निरीक्षण.<br>गावातील पारंपरिक खेळ व हस्तकलेचा अनुभव. | पर्यटकांच्या वास्तव्यासाठी बांबू किंवा मातीच्या घरांमध्ये व्यवस्था.<br>शेतीच्या विविध पद्धती (जसे सेंद्रिय शेती, पाणी व्यवस्थापन) शिकणे.<br>पारंपरिक स्वयंपाक बनवण्याचा अनुभव.<br>ग्रामीण भागातील लोककला, संगीत, नृत्य इत्यादींचे सादरीकरण. |

**कृषी पर्यटनाचे स्वरुप:**

कृषी पर्यटन ही एक पर्यटनांची नवीन व्यापक अशी संकल्पना असून ती मोठ्या प्रमाणावर विस्तारत आहे. सन २००४ सालापासून महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने कृषी पर्यटनाचा विकास होण्यास सुरवात झाली. शेतकरी किंवा शेतकरी गट, शासकीय, निमशासकीय संस्था, खाजगी संस्था यांनी कृषी पर्यटन संकल्पना मोठ्या प्रमाणावर राबवली आहे. या संस्था, समुहाच्या माध्यमातून शहरी पर्यटकांना ग्रामीण भागाकडे आकर्षित करत आहे. पर्यटकांना शेतीमध्ये चालणाऱ्या प्रत्यक्ष कामामध्ये सहभागी होण्याची संधी मिळते, शेतातील गाई, म्हशी, शेळी, बेल, कोंबडया, कुत्रा, मांजर यासारख्या पाळीव प्राण्यांच्या सानिध्यात वेळ घालवता येतो. बैलगाडी, ट्रॅक्टरमध्ये बसून ग्रामीण शिवाराचा फेरफटका मारुन आनंद घेता येतो. ग्रामीण भागातील चुलीवरील पिठलं, भाकरी, ठेचा अशाप्रकारचा जेवणाचा आनंद घेता येतो. तसेच चटणी, लोणचे, दही, दूध, ताक, लोणी, वांग्याचे भरीत, कांदा यासारख्या विविध पदार्थांचा आस्वाद घेता येतो.

कृषी पर्यटन केंद्राच्या माध्यमातून गावातील यात्रा, उत्सव, ग्रामीण सण, आठवडे बाजार याविषयी माहिती होते. ग्रामीण भागातील विटी दांडू, गोट्या, लंगडी, भोवरा, लपंडाव, खो-खो, कबड्डी, कुस्ती, मल्लखांब, आट्यापाट्या, सूरपारंबी यासारख्या विविध खेळांची माहिती होते. ग्रामीण भागातील विविध प्रकारची लोकनृत्ये, लोककला, गौळणी, भारुड, जागरण गोंधळ, वासुदेव याद्वारे ग्रामीण संस्कृतीची ओळख होते. ग्रामीण भागातील दगडांनी बांधलेले वाडे, पाचट काडाचा वापर करुन तयार केलेली घरे, ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवितात. ग्रामीण भागातील पुरुष व स्त्रियांचा वेशभूषा, राहणीमान याविषयी माहिती होण्यास मदत होते. तसेच शेतातील गहू, ज्वारी, मका, बाजरी, तूर, हरभरा, मूग, ऊस यासारखी पिके तसेच आंबा, केळी, चिक्कू, पेरु, डाळींब, सिताफळ, नारळ,

भेंडी, गवार, टोमॅटो, मिरची, गाजर, कोबी, काकडी, मेथी, कोथिंबीर, पालक, शेपू, इ. विषयी प्रत्यक्ष शेतात फेरफटका मारुन माहिती होण्यास मदत होते.

**कृषी पर्यटनाचे महत्त्व:**

प्रमुख कृषी उद्योग हा सेवा विभागातील पर्यटन व्यवसायाशी जवळीक साधू शकतो त्यामुळे दोन्ही विभागांना फायद्याची संधी मिळू शकते.

1. कृषी पर्यटनामुळे पर्यटक व शेतकरी या दोघांना थेट आर्थिक फायदा होतो.
2. शेतकऱ्यांना पर्यटकांचे आदरातिथ्य करुन शेती करतानाच उत्पन्नाचे नवे साधन मिळते.
3. शेतीमध्ये कमीत कमी गुंतवणूक करुन जास्तीत जास्त उत्पन्न देणारा कृषीपूरक व्यवसाय म्हणून कृषी पर्यटनाकडे पाहता येईल.
4. पर्यटकांना वाजवी दरात निसर्ग सानिध्याचा लाभ, माहितीपूर्ण मार्गदर्शक सहल, ग्रामीण जीवन व लोककलांचा परिचय घडतो.

**कृषी पर्यटनाची आवश्यकता:**

शहरी भागातील जीवन संस्कृतीला सामोरे जाताना निसर्ग सौंदर्याचा आनंद घेता येत नसल्याने शहरी भागातील पर्यटकांची पावले ग्रामीण भागाकडे वळत आहेत आणि यातूनच कृषी पर्यटनाचे क्षेत्र दिवसेंदिवस विस्तारत चालले आहे. कृषी पर्यटनातून पर्यावरणाचा कोणताही ऱ्हास न होता नैसर्गिक वातावरणात पर्यटनाचा आनंद लुटता येत असल्याने आज कृषी पर्यटनाची गरज निर्माण झाली आहे. दिवसेंदिवस शहरीकरण वाढत असल्याने ग्रामीण कला, संस्कृती, हस्तकला व अन्नपदार्थ लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. ग्रामीण भाग काहीसा शहरांच्या तुलनेत मागे पडताना दिसतो आहे. ग्रामीण संस्कृती, कला, खाद्यपदार्थ यांचे स्थान धोक्यात आलेले असतानाच दुसरीकडे शहरातील ताणतणावाला कंटाळेलेले पर्यटक नैसर्गिक सौंदर्याचा शांत वातावरणात फिरण्याचा आंनद घेण्यासाठी पर्यटन करताना दिसत आहेत. ग्रामीण भागातील स्थानिक हस्तकला, खाद्य संस्कृती, पारंपारिक कला, ग्रामीण संस्कृती टिकविण्यासाठी आज मोठ्या प्रमाणावर कृषी पर्यटनाची गरज निर्माण झालेली दिसून येते. कृषी पर्यटनातून ग्रामीण भागाचा ग्रामीणपणा जपला जातोच परंतु शेतक-यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासही कृषी पर्यटन साहाय्यभूत ठरताना दिसत असल्याने आज बहुतांशी भागात कृषी पर्यटन केंद्राची गरज निर्माण झाली आहे. या कृषी पर्यटनातून शहरी पर्यटकांना ग्रामीण संस्कृतीची ओळख करुन देण्याबरोबरच मानसिक ताण तणाव कमी करुन निसर्ग सौंदर्याचा आनंद अल्प दरात लुटता यावा हा उद्देश कृषी पर्यटनाच्या माध्यमातून झाल्यास शेतक-यांबरोबरच शहरी पर्यटकांनाही याचा फायदा होईल. यासाठी महाराष्ट्रातील अनेक भागात आज कृषी पर्यटन केंद्राची आवश्यकता असून या केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदतच होईल.

**कृषी पर्यटनाचे भविष्य:**

**शाश्वत ग्रामीण विकास:**

कृषी पर्यटनामुळे ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती होते. ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन शहरीकरणामुळे होणारे स्थलांतर रोखू शकते.

**उत्पन्नाचे विविध स्रोत:**

पिकांची अनिश्चितता, बाजारातील अस्थिरता आणि हवामान बदल यांसारख्या समस्यांचा शेतकऱ्यांना सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत कृषी पर्यटन हा उत्पन्नाचा एक अतिरिक्त स्रोत ठरतो. शेतकरी पारंपरिक शेतीव्यवसायाबरोबरच मार्गदर्शन, कार्यशाळा आणि शेतातील निवास सुविधा देऊन अधिक उत्पन्न मिळवू शकतात.

**शिक्षणाच्या संधी:**

कृषी पर्यटनामुळे सेंद्रिय शेती, शाश्वत शेती पद्धती आणि जैवविविधतेच्या संवर्धनाबाबत लोकांमध्ये जागृती

निर्माण होते. कुटुंबे, शाळा आणि महाविद्यालयांना थेट कृषी, पशुपालन आणि ग्रामीण जीवन शिकण्याची संधी मिळते.

**वारसा जतन आणि सांस्कृतिक देवाणघेवाण:**

कृषी पर्यटनामुळे प्रवाशांना स्थानिक खाद्यसंस्कृती, प्रथा आणि परंपरा अनुभवता येतात. यामुळे स्थानिक लोकांचे ज्ञान, हस्तकला आणि कला जतन होण्यास मदत होते.

**धोरणात्मक फ्रेमवर्क आणि शासकीय पाठबळ:**

कृषी पर्यटनाचे महत्त्व लक्षात घेऊन भारत सरकारने विविध उपक्रम सुरू केले आहेत. मात्र, शेतकऱ्यांना कृषी पर्यटनामध्ये सामील होण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या धोरणांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करणे आवश्यक आहे.

**आव्हाने:**

ग्रामीण भागात पायाभूत सुविधा (रस्ते, मलनिस्सारण आणि वीज) विकसित करणे अत्यावश्यक आहे. पर्यटन आणि पर्यावरण संवर्धन यामध्ये समतोल राखणे महत्वाचे आहे, जेणेकरून अतिरेकामुळे पर्यावरणाची हानी होणार नाही.

**जुन्नर, खेड, आणि आंबेगाव तालुक्यांतील आदिवासी भागाचा कृषी पर्यटन क्षेत्रातील महत्त्व:**

जुन्नर, खेड, आणि आंबेगाव तालुक्यांतील आदिवासी भागाचा कृषी पर्यटन क्षेत्रात महत्त्व खूप मोठं आहे, कारण या भागांमध्ये अद्वितीय सांस्कृतिक आणि पर्यावरणीय वैशिष्ट्ये आहेत, ज्यामुळे कृषी पर्यटनाच्या क्षेत्रात विविध संधी निर्माण होऊ शकतात. याचे काही प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे:

**1. सांस्कृतिक आणि पारंपरिक जीवनशैली:**

- **आदिवासी जीवनशैली**: या तालुक्यांमध्ये आदिवासी समुदायांच्या पारंपरिक जीवनशैलीचे एक मोठे महत्त्व आहे. त्यांची वेशभूषा, संगीत, नृत्य, आणि कलेच्या प्रकारांचा अनुभव पर्यटकांना मिळवता येऊ शकतो.
- **पारंपरिक कलेचे प्रदर्शन**: स्थानिक हस्तकला आणि पारंपरिक शिल्पकला पर्यटकांना आकर्षित करू शकतात. आदिवासी लोकांच्या शेतकरी जीवनाचा अनुभव घेणे, त्यांचे कृषी कार्य, जंगलातील तंत्रज्ञान आणि साधनांचा वापर पर्यटकांना कुतूहल निर्माण करतो.

**2. निसर्ग सौंदर्य आणि पर्यावरणीय संसाधन:**

- या तालुक्यांमध्ये विस्तृत जंगलं, डोंगर रांगा, नदया आणि प्राचीन किल्ले आहेत. या नैसर्गिक सौंदर्यामुळे स्थानिक कृषी पर्यटनाला मोठे महत्त्व मिळू शकते.
- **जैविक विविधता**: आदिवासी भागातील जैविक विविधता पर्यटनासाठी आकर्षक असू शकते. वनस्पती, प्राणी, आणि स्थानिक पर्यावरणीय संतुलनाचे संरक्षण पर्यटकांना अवगत करून, कृषी पर्यटनाच्या माध्यमातून जास्तीत जास्त निसर्ग संवर्धन केला जाऊ शकतो.

**3. कृषी उत्पादनाची विविधता:**

- **फळे आणि भाजीपाला**: जुन्नर, खेड, आणि आंबेगावमध्ये मोठ्या प्रमाणावर फळे आणि भाजीपाला उत्पादित केला जातो, ज्यामुळे कृषी पर्यटनामध्ये स्थानिक उत्पादने दाखवण्यासाठी संधी मिळते.
- **उत्पादन प्रक्रिया आणि अनुभव**: पर्यटकांना शेतकऱ्यांच्या कामकाजाचा, तसेच त्यांचे उत्पादन कसे होते याचा अनुभव घेता येईल. हे पर्यटकांना कृषी प्रक्रियेचा अवलोकन करून त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी देईल.

**4. आर्थिक आणि सामाजिक विकास:**

- **आर्थिक संधी**: कृषी पर्यटनाच्या माध्यमातून आदिवासी भागात रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात. होमस्टे सेवा, गाईड सेवा, स्थानिक हस्तशिल्प विक्री, आणि पारंपरिक

अन्न सेवा ही सर्व संधी पर्यटकांच्या आकर्षणासाठी महत्त्वाची ठरू शकतात.

- **सामाजिक समृद्धी**: कृषी पर्यटनाच्या वाढत्या किमतीमुळे आदिवासी समुदायांना एक स्थिर आर्थिक स्रोत मिळू शकतो. यामुळे त्यांची जीवनशैली आणि सामाजिक समृद्धी सुधारण्यास मदत होईल.

**5. पर्यावरणीय संवर्धन:**

- **जैविक कृषी पद्धतींचा वापर**: आदिवासी शेतकरी पारंपरिक जैविक कृषी पद्धती वापरतात, ज्यामुळे पर्यावरणाचे संवर्धन होऊ शकते. पर्यटकांना या पद्धती शिकवून ते पर्यावरणासाठी कसा फायदेशीर ठरू शकतो हे समजावता येईल.
- **प्राकृतिक संसाधनांचे संरक्षण**: आदिवासी लोकांचे प्राकृतिक संसाधनांचा योग्य वापर आणि संवर्धन पर्यावरणीय टिकावासाठी महत्वाचे ठरते. कृषी पर्यटनाद्वारे याची माहिती पर्यटकांना दिली जाऊ शकते.

**6. शिक्षण आणि जागरूकता:**

आदिवासी भागातील लोकांना कृषी पर्यटनाच्या माध्यमातून शेतकरी शिक्षण, पर्यावरणीय संवर्धन, आणि स्थानिक संसाधनांचे संरक्षण शिकवले जाऊ शकते.पर्यटक आणि स्थानिक लोकांच्या संवादामुळे जागरूकता वाढवता येईल आणि स्थानिक समुदायाच्या जीवनशैलीसाठी उपयुक्त ठरू शकतात.

जुन्नर, खेड, आणि आंबेगाव तालुक्यांतील आदिवासी भागाचा कृषी पर्यटन क्षेत्रात महत्त्व अत्यंत मोठे आहे. या क्षेत्रातील संधी आणि विविधता यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होऊ शकते आणि आदिवासी समुदायांना एक स्थिर आणि समृद्ध जीवन जगण्याची संधी मिळू शकते.

**आदिवासी भागातील कृषी पर्यटनाच्या संधी:**

आदिवासी भागांमध्ये कृषी पर्यटनाच्या विकासासाठी अनेक महत्त्वाच्या संधी आहेत. जुन्नर, खेड, आणि आंबेगाव तालुक्यांमधील सह्याद्री पर्वतरांगा, निसर्गसंपन्नता, आदिवासी परंपरा, आणि शेतीशी निगडित विविधता हे या क्षेत्राचे विशेष आकर्षण आहे. या संधींचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहे:

**1. निसर्गसंपन्नता आणि जैवविविधता:**

सह्याद्री पर्वतरांगा, जंगल, आणि धरणांनी व्यापलेल्या या भागातील नैसर्गिक सौंदर्य हे पर्यटकांसाठी एक प्रमुख आकर्षण आहे. पर्यटकांना या ठिकाणी निसर्गाचा ताजेपणा अनुभवता येतो. जैवविविधतेच्या संवर्धनासाठी या भागात केंद्रे उभारली गेल्यास पर्यावरण-पर्यटनाला प्रोत्साहन मिळेल. या केंद्रांद्वारे निसर्गप्रेमींचे लक्ष वेधून कृषी पर्यटनात वाढ होऊ शकते.

**2. पारंपरिक शेती पद्धती आणि आदिवासी ज्ञान:**

आदिवासींमध्ये पारंपरिक शेतीचे अद्वितीय तंत्रज्ञान, औषधी वनस्पतींची लागवड, आणि सेंद्रिय शेती यांचे मोठ्या प्रमाणावर ज्ञान आहे. पर्यटकांना या पारंपरिक पद्धती शिकविण्याच्या आणि सेंद्रिय उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या संधी आहेत. शाळा-महाविद्यालयांसाठी शैक्षणिक सहलींचे आयोजन करून विद्यार्थ्यांना पारंपरिक शेतीचा अनुभव देता येईल.

**3. संस्कृती आणि परंपरा:**

आदिवासी समाजाच्या लोककला, नृत्य, पारंपरिक वाद्य, आणि सण हे कृषी पर्यटनासाठी मोठे आकर्षण आहेत. कृषी पर्यटन केंद्रांमध्ये या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केल्यास पर्यटकांचा ओढा वाढेल. स्थानिक हस्तकला आणि वस्तू विक्रीसाठी व्यासपीठ निर्माण केल्यास स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

**4. धबधबे आणि इको-पर्यटन केंद्रे:**

माळशेज घाट, भीमाशंकर, आणि नाणेघाट यांसारखी निसर्गरम्य ठिकाणे या भागात आहेत. या ठिकाणी इको-पर्यटन केंद्रे उभारून पर्यटकांसाठी निवासी सुविधा निर्माण केल्यास या भागाचे महत्त्व

वाढेल. प्रदूषणमुक्त वातावरणात वेळ घालविण्यासाठी पर्यटकांना हे स्थळ अधिक आकर्षक वाटेल.

**5. स्थानिक खाद्यसंस्कृती:**

आदिवासी भागातील पारंपरिक पदार्थ, जसे की भाकरी, ठेचा, कंदमुळे, आणि वनस्पतीजन्य पदार्थ, हे पर्यटकांना विशेष अनुभव देऊ शकतात. स्थानिक खाद्यसंस्कृतीच्या प्रसाराद्वारे पर्यटकांच्या आवडीनिवडी जपल्या जाऊ शकतात. स्थानिक पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी पर्यटकांना आकर्षित करून कृषी पर्यटनाचा विस्तार साधता येईल.

आदिवासी भागातील निसर्ग, संस्कृती, आणि शेती यांचे अनोखे मिश्रण कृषी पर्यटनाला समृद्ध करण्यासाठी प्रभावी ठरते. या संधींचा योग्य प्रकारे वापर करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देता येईल.

**आदिवासी भागातील कृषी पर्यटनाच्या अडचणी:**

आदिवासी भागांमध्ये कृषी पर्यटनाच्या विकासास अडचणी आणि आव्हाने विविध प्रकारे समोर येत आहेत. या अडचणींवर प्रभावीपणे मात करणे महत्त्वाचे आहे, कारण यामुळे कृषी पर्यटनाच्या संधींचा योग्य वापर होऊ शकतो. खालीलप्रमाणे विविध अडचणींविषयी सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे:

**1. आधारभूत सुविधांचा अभाव:**

आदिवासी भागांमध्ये रस्ते, वीज, पाणी, आणि दूरसंचार यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव आहे. या सुविधांशिवाय पर्यटकांना चांगल्या सेवांचा अनुभव देणे अत्यंत कठीण आहे. यामुळे कृषी पर्यटनाच्या विकासात मोठा अडथळा येतो. राज्य आणि केंद्र सरकारने या भागात पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी तातडीने कार्यवाही करणे गरजेचे आहे.

**2. गुंतवणुकीचा अभाव:**

आदिवासी भागातील कृषी पर्यटन प्रकल्प राबवण्यासाठी निधीची टंचाई आहे. कृषी पर्यटनाच्या विकासासाठी प्रकल्प आणि पायाभूत सुविधांची आवश्यकता असताना, गुंतवणुकीचा अभाव एक मोठी समस्या बनलेली आहे. यावर उपाय म्हणून खाजगी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना आणि प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. आदिवासी बचत गटांना प्रोत्साहन देऊन स्थानिक गुंतवणूक वाढवता येईल.

**3. स्थानिकांचा कमी सहभाग:**

अनेकदा स्थानिक लोक कृषी पर्यटनाच्या संकल्पनेशी अपरिचित असतात. स्थानिकांना कृषी पर्यटनाच्या महत्त्वाची माहिती देणे आणि त्यात सक्रिय सहभाग घेतल्यास त्यांची समाजिक आणि आर्थिक स्थिती सुधारू शकते. यासाठी प्रशिक्षण आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित करून स्थानिकांना कृषी पर्यटनात सहभागी करून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

**4. मार्केटिंगची कमतरता:**

आदिवासी भागातील कृषी पर्यटनाची माहिती प्रभावीपणे पोहोचत नाही.आदिवासी भागांमध्ये कृषी पर्यटनाच्या मार्केटिंगसाठी प्रभावी प्रचाराची कमी आहे. डिजिटल माध्यमांचा वापर करून जागतिक स्तरावर प्रचार वाढवता येईल. स्थानिक हस्तकला आणि खाद्यपदार्थांना ऑनलाईन विक्रीसाठी प्लॅटफॉर्म तयार केल्यास त्यांची ओळख वाढवता येईल. यामुळे कृषी पर्यटनाला जागतिक स्तरावर लोकप्रियता मिळू शकते.

**5. पर्यावरणावर होणारा परिणाम:**

पर्यटकांच्या येणामुळे निसर्गाचा ऱ्हास होण्याची शक्यता असते. प्राकृतिक पर्यावरणाचा धक्का न लागता पर्यटकांची सेवा देणे महत्त्वाचे आहे. यासाठी पर्यावरणपूरक धोरणे आखून जैवविविधतेचे संरक्षण सुनिश्चित करणे आवश्यक आहे. पर्यटनाच्या व्यवस्थापनासाठी पर्यावरणीय निकषांचा समावेश करणे आवश्यक आहे.

**6. स्थानिक सांस्कृतिक ओळख गमावण्याचा धोका:**

शहरीकरणामुळे आदिवासींची पारंपरिक संस्कृती हरवण्याची भीती आहे. आधुनिकतेच्या प्रभावामुळे स्थानिक आदिवासी समाजाची पारंपरिक

संस्कृती आणि ओळख धोक्यात येऊ शकते. यासाठी स्थानिक संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी धोरणात्मक प्रयत्न करणे गरजेचे आहे. स्थानिक परंपरांचा प्रचार व संवर्धन करण्याचे कार्य कृषी पर्यटनाच्याद्वारे साधता येईल.

आदिवासी भागातील कृषी पर्यटनाच्या अडचणींचा विचार करतांना, पायाभूत सुविधांपासून पर्यावरणीय संरक्षणापर्यंत विविध मुद्दे समोर येतात. या अडचणींवर तातडीने उपाययोजना केल्यास कृषी पर्यटनाच्या संधींना अधिक जोम मिळू शकतो.

**शिफारसी: आदिवासी भागातील कृषी पर्यटनाचा विकास:**

**1. धोरणात्मक उपाय:**

- *पेसा* ग्रामपंचायतींनी स्थानिक पातळीवर कृषी पर्यटनाच्या विकासासाठी विशेष धोरणे आखावीत.
- स्थानिक कृषी उत्पादनांचे ब्रँडिंग आणि विपणन केंद्र स्थापन करावे.
- शासकीय धोरणांमध्ये आदिवासी भागातील कृषी पर्यटनासाठी आर्थिक सवलतींचा समावेश करावा.

**2. प्रशिक्षण व शिक्षण:**

प्रशिक्षण शिबिरे:

- आदिवासी तरुण-तरुणींना कृषी पर्यटन व्यवस्थापन, ग्राहक सेवा, आणि भाषा कौशल्य शिकवण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करावीत.
- स्वयंपाक, हस्तकला, आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचे तंत्र शिकवावे.

शैक्षणिक उपक्रम:

- स्थानिक शाळा व महाविद्यालयांमध्ये कृषी पर्यटन विषय समाविष्ट करणे.
- डिजिटल माध्यमांचा वापर करून ऑनलाइन प्रशिक्षण पाठ्यक्रम सुरू करणे.

**3. सहकार्य व भागीदारी:**

स्थानिक गटांची स्थापना:

- कृषी पर्यटनासाठी सहकारी गट किंवा स्वयंसहाय्यता गट स्थापन करावेत.
- गटांना मार्गदर्शनासाठी कृषी तज्ज्ञ व अर्थशास्त्रज्ञांची मदत घ्यावी.

खाजगी भागीदारी:

- CSR निधी व खाजगी गुंतवणूकदारांचा उपयोग करून पायाभूत सुविधा उभाराव्यात.

**4. पर्यावरण संरक्षण:**

- पर्यावरणपूरक पर्यटनासाठी *ग्रीन टुरिझम मॉडेल* विकसित करणे.
- प्लास्टिकचा वापर कमी करणे, सांडपाणी व्यवस्थापन, व ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर करणे.
- स्थानिक जैवविविधता जपण्यासाठी झाडे, प्राणी, आणि जलस्रोत यांचे संरक्षण उपक्रम राबवणे.

**5. आर्थिक मदत:**

शासकीय योजना व अनुदाने:

- "प्रधानमंत्री रोजगार योजना" व "मुद्रा योजना" यांचा लाभ मिळवून देण्यासाठी मदत केंद्रे स्थापन करावीत.
- आदिवासी पर्यटन व्यवसायांसाठी कर सवलती लागू कराव्यात.

कर्ज आणि वित्तीय सहाय्य:

- स्थानिक उद्योजकांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देणे.
- राष्ट्रीयकृत बँका व सूक्ष्म वित्तीय संस्थांशी सहकार्य वाढवणे.

वरील शिफारसींच्या अंमलबजावणीमुळे आदिवासी भागांतील कृषी पर्यटनाला शाश्वत विकासाची दिशा मिळेल. यामुळे रोजगार निर्मिती होईल, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, आणि आदिवासी समाजाच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवता येईल.

**सारांश:**

पुणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील कृषी पर्यटनाच्या अभ्यासातून असे दिसून आले की जुन्नर, खेड, आणि आंबेगाव तालुक्यात कृषी पर्यटनासाठी खूप मोठ्या संधी उपलब्ध आहे.कृषी पर्यटन ही संकल्पना शहरी लोकांना ग्रामीण संस्कृतीची ओळख करून देण्याबरोबरच शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचे साधन ठरते. या भागातील नैसर्गिक साधनसंपत्ती, ऐतिहासिक स्थळे, आणि धार्मिक महत्त्वाची ठिकाणे कृषी पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी उपयुक्त ठरतात.

आदिवासी भागात कृषी पर्यटन व्यवसायाचा विकास करत असताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. यामध्ये अपुऱ्या पायाभूत सुविधा, स्थानिक कौशल्यांचा अभाव, आणि विपणनासाठी आवश्यक असलेल्या साधनांची कमतरता यांचा समावेश आहे. या अडचणींवर मात करण्यासाठी सरकार, स्थानिक संस्था, आणि शेतकरी यांना एकत्रित काम करणे आवश्यक आहे.

शिफारसीतून स्पष्ट होते की कृषी पर्यटनाच्या वाढीसाठी स्थानिकांना प्रशिक्षण देणे, पर्यटनसंबंधित व्यवसाय वाढवणे, आणि आदिवासी संस्कृतीशी संबंधित वस्तू व सेवांना बाजारपेठेत स्थान देणे गरजेचे आहे. या प्रयत्नांमुळे आदिवासी भागातील स्थलांतर थांबवून आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करता येईल. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून आदिवासी भागाचा सर्वांगीण विकास साधता येईल, असे निष्कर्ष या अभ्यासातून निघतात.

**संदर्भ:**


1. चप्पलवार, गणेश. (2024). कृषी पर्यटन उद्योजकांची यशोगाथा. वल्ली प्रकाशन, शनिपार पेठ, पुणे.
2. हाडवळे मनोज, कृषी पर्यटन, सकाळ पब्लिकेशन
3. कटोले रवींद्र, कृषी पर्यटन, गोडवा कृषी प्रकाशन.
4. कृषी व ग्रामीण पर्यटन मार्गदर्शिका (मार्ट) महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण पर्यटन सहकारी महासंघ मर्यादित (मार्ट) पुणे
5. विस्तार कृषी पर्यटनाचा बराटे बाळासाहेब लोकप्रभा (मासिक) दिवाळी २०१६.
6. Shinde, H. R. (2019). Performance of agro-tourism centers in Ratnagiri district (M.S.): an economic analysis. M.Sc., (Agri.) Thesis Dr. Balasaheb Sawant Konkan Krishi Vidyapeeth, Dapoli, Maharashtra.
7. Wikipedia. (2023, October). Retrieved from Agritourism: https://en.wikipedia.org/wiki/Agritourism
8. www.kokankisan.com
9. www.vikaspedia.com
10. www.esakal.com